| MHBI150018652022 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक २६१/२०२२ मधील निशाणी क्र.५ खालील आदेश** |
| --- | --- |

[०१] प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र.१ यांनी त्यांच्या वडिलांमार्फत महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम, २००५ च्या कलम २३ (२) अन्वये अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

[०२] **अर्जदारांचे अर्जाची थोडक्यात हकीगत खालीलप्रमाणे :**

गैरअर्जदार हा अर्जदार क्र.१ चा पती असून त्यांचा विवाह दिनांक ११.०२.२०१८ रोजी कुंभाड, रोहिदासवाडी, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे झाला. लग्नानंतर गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ ला ७ ते ८ महिने कसेबसे नांदविले. त्यानंतर गैरअर्जदार हा अर्जदार क्र.१ हीस सतत या ना त्या कारणावरुन त्रास देत असे. दरम्यानच्या काळात अर्जदार क्र.१ ला गैरअर्जदारापासून एक मुलगी नामे प्रांजल ही झाली. गैरअर्जदार हा अर्जदार क्र.१ चे चारित्र्यावर विनाकारण संशय घेत असे. गैरअर्जदार हा अर्जदार क्र.१ हिस दुकान टाकण्याकरिता माहेरहून एक लाख रुपये घेऊन ये म्हणून तिला शिवीगाळ करुन मारहाण करीत असे, तिला उपाशीपोटी घरामध्ये कोंडून ठेवत असे. दिनांक १६.१०.२०२२ रोजी रात्री ८.०० वाजणेचे सुमारास गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ हिस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली व उपाशीपोटी घरात कोंडून ठेवले व माहेरहून एक लाख रुपये घेऊन ये म्हणून अंगावरील दागदागिने काढून अर्जदार क्र.२ सह घराबाहेर हाकलून दिले. तेव्हापासून अर्जदार हे आई–वडिलांकडे माहेरी राहत आहे.

[०३] गैरअर्जदाराने अर्जदारांच्या पालण–पोषणाची कसल्याही प्रकारे

जबाबदारी घेतली नाही. अर्जदार क्र.१ च्या आई–वडिलांची परिस्थिती जेम–तेम असल्यामुळे ते अर्जदारांचा सांभाळ व पालन–पोषणाचा खर्च करु शकत नाहीत. गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ हिस लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्यामुळे ती सतत आजारी असते. तिला कसल्याही प्रकारचा कामधंदा होत नाही. अर्जदार क्र.१ कडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे ती स्वतःची व अर्जदार क्र.२ ची उपजिविका भागवू शकत नाही. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. अर्जदार क्र.२ ही शिक्षण घेत आहे. त्यामुळे अर्जदारांना दरमहा रक्कम रु.२०,०००/– खर्च येतो. गैरअर्जदार हा दुकान व टपरीचा व्यवसाय करत असून त्यापासून त्याला दरमहा ६०,०००/– रुपये निव्वळ उत्पन्न मिळते. गैरअर्जदाराची परिस्थिती सधन असून तो अर्जदार क्र.१ व २ यांना प्रत्येकी दरमहा ७,०००/– रुपये पोटगी देऊ शकतो. त्यामुळे अर्जदारांनी गैरअर्जदाराकडून प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत स्वतःच्या खर्चासाठी, कपडयासाठी, औषधोपचारासाठी व अन्य घरगुती खर्चासाठी दरमहा प्रत्येकी ७,०००/– इतकी रक्कम अंतरिम पोटगी म्हणून मिळावी याकरिता प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे.

[०४] गैरअर्जदारास नोटीस तामील होऊनही ते या प्रकरणात हजर न झाल्यामुळे दिनांक ०८.०२.२०२४ रोजी निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करुन सदर प्रकरण त्यांचेविरुध्द एकतर्फा चालविण्यात आले.

[०५] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदारांचे विद्वान वकिलाचा युक्तिवाद ऐकला.

[०६] महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३(२) च्या प्रकाशात या न्यायालयास जर अर्जदाराने

प्रथमदर्शनी ती घरगुती हिंसाचाराची बळी असल्याचे सिध्द केल्यास प्रस्तुतच्या अर्जात मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगीचा आदेश पारीत करता येतो. अधिनियमाच्या कलम ३(३) मध्ये देण्यात आलेल्या घरगुती हिंसाचाराच्या व्याख्येप्रमाणे "महिलेस शारीरिक किंवा मानसिकरित्या नुकसान किंवा इजा पोहचेल किंवा तिच्या जिवीतास किंवा सुरक्षिततेस धोका निर्माण होईल असे कोणतेही कृत्य किंवा कोणतेही वर्तन" घरगुती हिंसाचार ठरतो. यापुढे जावुन अधिनियमाच्या कलम ३(३) च्या स्पष्टीकरणाच्या प्रकाशात क्लेश, धमकी, अनाचार, हुंडा किंवा संपत्तीची मागणी, शारिरीक शोषण, मानसिक शोषण, आर्थिक शोषण, भावनात्मक शोषण इत्यादीचा समावेश देखील घरगुती हिंसाचाराच्या व्याख्येत येतो. त्यामुळे अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जाची गुणवत्ता वरनमुद व्याख्येच्या प्रकाशात तपासणे गरजेचे ठरते.

[०७] प्रस्तुत प्रकरणात अभिलेखावर आलेल्या वस्तुस्थिती, परिस्थितीचे, दाखल कागदपत्रे व अर्जदाराने निशाणी १४ खाली दाखल केलेले मत्ता व दायित्वाचे शपथपत्र यांचे अवलोकन केले. अर्जदार यांनी त्यांच्या मुळ अर्जामध्ये गैरअर्जदार यांनी त्यांचा कौटुंबिक हिंसाचार केल्याच्या अनेक घटना नमुद केल्या आहेत. जसे की, गैरअर्जदार हे अर्जदार क्र.१ हिच्या चारित्र्यावर विनाकारण संशय घेऊ लागला. त्यानंतर गैरअर्जदार याने अर्जदार क्र.१ हिस दुकान टाकण्यासाठी आई-वडिलांकडून एक लाख रुपये घेऊन ये म्हणून पैशाची मागणी करीत असे. गैरअर्जदार हा अर्जदार क्र.१ ला शिवीगाळ करुन मारहाण करीत असे व उपाशी पोटी घरात कोंडून ठेवत असे. दिनांक १६.१०.२०२२ रोजी रात्री ८.०० वाजणे सुमारास गैरअर्जदार याने अर्जदार हिला मारहाण करुन माहेरहून एक लाख रुपये आण असे म्हणून तिच्या अंगावरील दागदागिणे काढून घेऊन अर्जदार हिला तिची अज्ञान मुलगी प्रांजल

हिच्यासोबत घराबाहेर हाकलून दिले. या उलट गैरअर्जदारास नोटीस बजावणी होऊनही त्यांनी प्रकरणात हजर होऊन आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे अर्जदारांनी केलेली कथने विनाआव्हानीत राहिलेली आहेत. त्यामुळे एकंदरीत सर्व वस्तुस्थिती, परिस्थिती व अर्जदाराने दाखल केलेले शपथपत्र यांचा विचार करता गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केला असल्याचे आज तारखेस प्रथमदर्शनी दिसून येते.

[०८] अर्जदार हिने गैरअर्जदार हा दुकान व टपरीचा व्यवसाय करत असून त्यापासून त्याला दरमहा ६०,०००/– रुपये निव्वळ उत्पन्न मिळत असल्याचे तोंडी कथन केले आहे. परंतु गैरअर्जदाराने अर्जदाराचे या कथनांना कोठेही आव्हानी दिलेले नाही. त्यामुळे अर्जदार क्र.१ व २ यांना गैरअर्जदाराकडून अंतरिम पोटगी मिळण्याचा हक्क प्राप्त होतो. आता अंतरिम पोटगी किती असावी असा प्रश्न निर्माण होतो. अर्जदाराने गैरअर्जदाराच्या उत्पन्नाचे साधन हे दुकान व टपरी असे सांगीतले आहे. परंतु याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. याहून सुध्दा अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदाराची विवाहित पत्नी असून अर्जदार क्र.२ ही गैरअर्जदाराची अज्ञान मुलगी आहे. त्यामुळे अर्जदारांचा सांभाळ करण्याची कायदेशीर जबाबदारी ही गैरअर्जदाराची आहे. परंतु प्रस्तुतच्या अर्जामध्ये गैरअर्जदाराच्या उत्पन्नाबद्दल संभ्रमता दिसून येते. त्यामुळे साधारणतः एखाद्यी टपरीचा व्यवसाय करणारी व्यक्ती प्रतिदिन २००/– ते ३००/– रुपये कमविते. सदरची बाब लक्षात घेऊन त्याचे दरमहा उत्पन्न साधारण ६०००/– ते ९०००/– इतके होते. तसेच अर्जदार यांचा राहणीमानाचा दर्जा व गैरअर्जदार यांचा आर्थिक दर्जा लक्षात घेता अर्जदारांना अंतरिम पोटगी मिळणे न्यायाच्या दृष्टीने ईष्ट राहिल. त्यामुळे खालील आदेश पारीत करण्यात येत

आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** प्रस्तुतचा अर्ज अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

**२.** गैरअर्जदार यांनी अर्ज दाखल तारखेपासुन ते प्रस्तुत प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत दरमहा अंतरिम पोटगीच्या स्वरुपात अर्जदार क्र.१ ला रुपये ५००/– व अर्जदार क्र.२ ला रुपये १,०००/– देण्याबाबत आदेशीत करण्यात येत आहे.

**३.** प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना मोफत देण्यात यावी.

Digitally signed by PATIL ARTEE ASHOKRAO
Date: 2024.06.26 17:05:28 +0530

दिनांक – २६.०६.२०२४.

(श्रीमती ए.ए.पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पाटोदा.

**:: C E R T I F I C A T E ::**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Sd/-
(R.M.Naik)
Steno Grade-III

(a) Dictated on : 26/06/2024
(b) Transcribed on : 26/06/2024
(c) Checked & signed on : 26/06/2024